आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय  कुळगाव बदलापूर

## अहवाल

## नेतृत्व विकास कार्यशाळा

आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय व विवेकानंद केंद्र बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक १५/९/२०२२ रोजी नेतृत्व विकसन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक करताना प्र-प्राचार्या संगीता पांडे यांनी राष्ट्र विकासात आपली भूमिका उत्तमपणे करण्यासाठी नेतृत्व गुण विकासाची गरज आहे, तसेच विकसनशील देशाकडून विकसीत देशाकडे जायचे असेल तर त्या सामाजिक जाण असणाऱ्या तरुणांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माननीय श्री. गिरीश टिळक यांनी नेतृत्व विकासासाठी सदय परिस्थितीची जाण ठेवणे आणि भविष्याचे भान ठेवणे,आवश्यक आहे असे सांगितले. नेतृत्व विकसनसाठी माहिती मिळवणे, वाचन करणे, संवाद करणे व शहाणपणाचा वापर करून योग्य रीतीने जीवन जगल्यास यश मिळतेच असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात माननीय श्री. उपेंद्र जोशी यांनी यशस्वी होण्याची विविध सूत्रे काही प्रेरणादायी उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट केले. आपल्या क्षमता ओळखा, यशातील अडथळ्यांना संधी माना, प्राधान्य ठरवा, लोक संपर्क वाढवणे, माहिती गोळा करणे. योग्य दृष्टिकोन ठेवणे व संवाद साधणे यातून यश मिळते व यश मिळवणे महत्त्वाचे ठरते असे त्यांनी सांगितले.

तिसऱ्या सत्रात श्रद्धा भोपी या विद्यार्थ्यांनीने स्वामी विवेकानंद यांच्या भाषणाचे अभिवाचन केले. यानंतर विद्यार्थ्यांना गटात विभागून विविध विषयांवर गटचर्चा करण्यास सांगण्यात आले. यामध्ये उपभोगवाद, स्वातंत्र्याच्या 75 वर्षातील विविध आव्हाने, व्यवहारातील देशभक्ती इत्यादी विषयांवर गटचर्चा व सादरीकरण झाले. यानंतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. त्यानंतर आभार प्रदर्शन व विश्वप्रार्थना होऊन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यशाळेत 90 विद्यार्थी सहभागी झाले होते.